# लेखा विभाग

दूरध्वनी :-०२०-६७३३१५१६ फॅक्स :२७४२५६०० E-mail :account @pcmcindia.gov.in

Website : www.pcmcindia.gov.in

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८, लेखा विभाग


क्रमांक - लेखा/३२/कावि/९३/२०१७

दिनांक - ३१/१/२०१७

**विषय :- सेवानिवृत्ती/कुटुंबनिवृत्ती प्रकरणे वेळेत सादर करणे बाबत..**

**परिपत्रक**

महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतन नियम १९८२ नुसार शासकीय कर्मचारी सेवेतून नियत वयोमान सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, कुटुंब निवृत्ती वेतन, वैदयकीय सेवानिवृत्ती, सक्तीने सेवा निवृत्ती इ.सर्व प्रकरणे सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभ अदा करणे कामी लेखा विभागाकडे प्राप्त होत असतात. अशा सेवानिवृत्त सेवकांना त्यांचे सेवानिवृत्तीचे दिवशी अर्थीक लाभांचे धनादेश त्याच दिवशी समारंभपूर्वक वितरीत करणेची मागील काही वर्षांची प्रथा आहे. तथापी सदरची प्रकरणे काही कारणास्तव संबंधीत विभागाकडून वेळेत प्राप्त होत नाहीत. तसेच प्रकरणात त्रृटी असलेचे कारणास्तव प्रकरणे संबंधीत विभागाकडे पुर्ततेकामी फेरसादर करणेत येतात. त्यामुळे अशा प्रकरणी सेवानिवृत्त सेवकांना सेवानिवृत्तीचे लाभ, सेवानिवृत्ती समारंभात / वेळेत देणे लेखा विभागाला शक्य होत नाही.

सदर परिपत्रकाद्वारा सर्व शाखाप्रमुख यांना सुचित करणेत येते की, महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्त वेतन नियम १९८२ मधील नियम १२१ (१) (सी), १२३(१) नुसार नियत वयोमानाची प्रकरणे किमान ६ महिने आगोदर सुरु करुन, सर्व निवृत्ती/कुटुंब निवृत्ती प्रकरणे तसेच भ.नि.नि. व गटविमा प्रकरणे (इकडील परिपत्रक क्र.लेखा/३२/कावि/३७/२०१४ दिनांक ७/२/२०१४) नुसार लेखा विभागास वेळेत सादर करणेत येऊन संबंधीत लिपीकाकडून त्याची पडताळणी करुन घेणेत यावी. तसेच कुटुंब निवृत्ती वेतन प्रकरणामध्ये विभाग प्रमुखांनी विशेष लक्ष घालून परिपुर्ण प्रकरणे तातडीने सादर करावीत.

अशी प्रकरणे वेळेत प्राप्त न झालेस व त्याबाबत कर्मचा-यांनी/वारसांनी तक्रार केल्यास महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्त वेतन नियम १९८२ मधील कलम १२९(अ), १२९(ब) त्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधीत विभागाची राहील याची सर्व विभाग प्रमुखांनी नोंद घ्यावी.

विविध सेवानिवृत्ती कुटुंबनिवृत्ती, भ.नि.नि., गटविमा विषयक संच व माहिती PCMC Web Portal येथे उपलब्ध करणेत आले आहेत.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८